# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

## महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी या पदासाठी जाहिरात

**(मदतीसाठी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक:- 020-26168486)**

आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांनी राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी यांची नियुक्ती करण्याचे ठरविले आहे. उमेदवारांची निवड करण्यासाठी महासंचालक, यशदा, यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती स्थापन करण्यात आली असून निवड समितीमार्फत सदर पदांसाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पदांचे तपशील खालील प्रमाणे आहेत.

| पदाचे नाव | पदाचे तपशील |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी | एकूण १८ पदे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उमेदवारांसाठी प्रत्येकी ३ पदे आरक्षित) |
| | नेमणूक तीन वर्षे कालावधीसाठी केवळ तात्पुरत्या स्वरुपात असेल |
| | मानधन पहिल्या वर्षाकरिता एकूण रु. ७५,००० प्रती माह (रु. ७०,००० मानधन अधिक रु. ५००० स्थानिक प्रवास भत्ता) |

**टीप:** सदर पदांबाबत अधिक माहितीसाठी कृपया आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. केंद्रीय-२०१६/प्र.क्र.१७/का-१९, दिनांक ०४/०४/२०१६ तसेच केंद्रीय-२०१६/प्र.क्र.१७/का-१९, दिनांक ०९/०५/२०१६ पाहावे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

### १. पात्रता विषयक अटी :-

**अ) आवश्यक पात्रता**

**क) निवडीसाठी शैक्षणिक अर्हता** :- दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी उमेदवार कोणत्याही अधिकृत विदयापीठामार्फत किमान ४ वर्ष कालावधीचा कोणत्याही शाखेचा अभ्यासक्रम पूर्ण करुन पदवी धारण केलेला असावा. पदवीचा कालावधी ४ वर्षापेक्षा कमी असल्यास पात्रतेसाठी कोणत्याही अधिकृत विदयापीठाची पदव्युत्तर पदवी धारण केलेला असावा. पात्रतेसाठी आवश्यक असलेल्या पदवी किंवा पदव्युत्तर पदवीमध्ये एकूण गुणांपैकी ५०% गुण उमेदवारांनी संपादन केलेले असावेत. गुणपत्रिका ग्रेड पध्दतीची असल्यास ग्रेडचे रुपांतर गुणांमध्ये करावे.

**ख) अनुभव:-** दिनांक १ ऑगस्ट २०१६ रोजी उमेदवारास ग्रामीण किंवा आदिवासी भागामध्ये काम केल्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. अनुभवाचा पुरावा म्हणून कोणतेही शासकीय कार्यालय अथवा कोणतीही नोंदणीकृत संस्था, कंपनी, सोसायटी, ट्रस्ट यांच्या लेटरहेड वरील नियुक्ती आदेश अथवा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक.

**ग) भाषा ज्ञान:-** उमेदवारास मराठी भाषेची उत्तम जाण असावी (बोलणे, लिहिणे व वाचणे.) याबाबत दाखला म्हणून इयत्ता १० वी/ १२ वी मध्ये मराठी विषयात उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक आवश्यक.

**घ) वयोमर्यादा :-** दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी उमेदवाराचे वय किमान २१ वर्षे व कमाल ३३ वर्षे असावे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादेत ५ वर्षे सूट राहील.

**ङ) अधिवास :-** उमेदवार महाराष्ट्रातील अधिवास धारण केलेला असावा. अधिवासाचा पुरावा म्हणून अधिवास दाखला (Domicile Certificate ) ग्राह्य धरण्यात येईल.

**च) शारीरिक योग्यता:-** अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक शारीरिक योग्यता प्रमाणपत्र हे कोणत्याही शासकीय वैद्यकीय रुग्णालयातून प्राप्त करून निवडीनंतर ३० दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

**टीप:** अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या पदांसाठी निवड करून शासनास शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी शासनाने विहित केलेल्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करणे बंधनकारक राहील.

**आ) प्राधान्य पात्रता**

**क)** Prime Minister's Rural Development Fellow (PMRDF) म्हणून फेलोशिप पूर्ण केलेल्या अथवा PMRDF Fellow म्हणून कार्यरत असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**ख)** सामाजिक क्षेत्रात काम करण्याचा अनुभव, शालेय अथवा महाविद्यालयातील शाळाबाह्य उपक्रम जसे की कला, सांस्कृतिक, खेळ इत्यादी व नेतृत्व गुणामध्ये दाखविलेल्या उपक्रमांचा देखील निवड करताना प्राधान्याने विचार करण्यात येईल.

**टीप:** लेखी परीक्षेतील गुण व मुलाखतीचे गुण मिळून उमेदवारांना मिळणारे एकत्रित गुण हे एका पेक्षा अधिक उमेदवारांना समान असतील तर प्राधान्य पात्रतेचा विचार करण्यात येईल.

२. **सहयोगींची संख्या :-** सदरहू कार्यक्रमाकरिता सहयोगींची संख्या १८ अशी निश्चित केली असून, त्यापैकी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी प्रत्येकी ३ पदे आरक्षित राहतील.

३. **निवड प्रक्रियेचे टप्पे :-** निवड प्रक्रियेचे तीन टप्पे असतील ज्यामध्ये प्रथम टप्प्यात उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील. यशस्वीपणे अर्ज भरणाऱ्या उमेदवारांची द्वितीय टप्प्यात ९० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये केवळ पॉझिटीव गुण (Positive Marks) मिळालेल्या उमेदवारांच्या गुणश्रेणीतून एकूण १८ पदांच्या सुमारे पाचपट प्रमाणात उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. अंतिम निवडीमध्ये लेखी परीक्षेस ९० गुण तर मुलाखतीस १० गुण असे एकूण १०० गुण असतील. लेखी परीक्षा व मुलाखत याचे एकत्रित गुण प्रत्येक उमेदवाराला त्याच्या लॉगिन आयडी मार्फत बघण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, लेखी परीक्षा व मुलाखतीच्या एकत्रित गुणांच्या आधारे शासनास शिफारस करावयाची निवड यादी (१८ उमेदवार) व प्रतीक्षा यादी (९ उमेदवार) अशा एकूण २७ उमेदवारांची यादी http://www.geexam.com या संकेतस्थळावर तसेच आदिवासी विकास विभाग व यशदा यांच्या संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यात येईल. निवड प्रक्रियेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे. तथापि, अपरिहार्य परिस्थितीत सदर वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार निवड समिती राखून ठेवत आहे. वेळापत्रकातील कोणताही बदल हा केवळ http://www.geexam.com या संकेतस्थळावरच सूचित

करण्यात येईल व अन्य कोणत्याही मार्गाने तो उमेदवारांना कळविण्यात येणार नाही. उमेदवारास माहिती न मिळाल्यास निवड समिती त्यास जबाबदार राहणार नाही. या करिता, निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी उपरोक्त संकेतस्थळास नियमितपणे भेट द्यावी.

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्जाची उपलब्धता | १५/०६/२०१६ |
| ऑनलाईन अर्जांच्या उपलब्धतेची अंतिम तारीख | १०/०७/२०१६ |
| बँकेमध्ये शुल्क भरून ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख | १५/०७/२०१६ |
| लेखी परीक्षेच्या प्रवेशपत्राची ऑनलाईन उपलब्धता | ०१/०८/२०१६ |
| लेखी परीक्षा | ०७/०८/२०१६ |
| लेखी परीक्षेचा ऑनलाईन निकाल व मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीचे ऑनलाईन पत्र | २२/०८/२०१६ |

**४) टप्पा १: ऑनलाईन अर्ज भरणे**

**क)** उमेदवारांचे अर्ज केवळ ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जातील. अन्य कोणतेही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी. विहित नमुन्यानुसार/ निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला असून या संदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

**ख)** विहित केलेला ऑनलाईन अर्ज आणि अर्ज भरावयाची माहिती http://www.geexam.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**ग)** उमेदवारांनी प्रथम http://www.geexam.com या संकेतस्थळावर जाऊन **'MSTDA'** या लिंकवर क्लिक केल्यावर ऑनलाईन अर्ज भरण्याच्या सूचना स्क्रीनवर दिसतील.

**घ)** ऑनलाईन अर्जामधील सूचना काळजीपूर्वक वाचून त्या नुसार उमेदवाराने अर्ज ऑनलाईन भरावा.

**ङ)** उमेदवाराने दि. १५/०६/२०१६ ते दि. १०/०७/२०१६ या कालावधीमध्ये ऑनलाईन अर्ज करावा. ऑनलाईन अर्ज दि. १०/०७/२०१६ पर्यंतच http://www.geexam.com या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

**च)** उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी स्वत:चा लॉगिन आयडी तयार करणे आवश्यक आहे. उमेदवाराने आपल्या लॉगिन आयडीची कोणत्याही परिस्थिती इतर व्यक्तींबरोबर देवाण घेवाण करू नये.

**छ)** उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे. तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक परीक्षेचा निकाल लागेपर्यंत वैध असणे आवश्यक आहे. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक चुकीचा/ अपूर्ण असल्यास, तसेच भ्रमणध्वनी क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे निवड प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सूचना व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी संदेश वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना निवड समिती जबाबदार राहणार नाही.

**ज)** उमेदवाराने अर्जात स्वत:चे नाव, जन्मदिनांक, मोबाईल नंबर व ई-मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. सदरची माहिती चुकल्यास त्यास निवड समिती जबाबदार राहणार नाही.

**झ)** उमेदवाराचा रजिस्ट्रेशन नंबर व पासवर्ड योग्य पध्दतीने रजिस्ट्रेशन झाल्यानंतर त्याच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येईल. जर उमेदवाराला ई-मेल द्वारे सूचना मिळाली नाही तर त्याचा अर्ज योग्य पध्दतीने रजिस्टर झाला नाही असे समजावे.

**ञ)** छायाचित्र व स्वाक्षरी अप-लोड करण्याची पध्दत:- उमेदवाराने खाली नमूद केल्याप्रमाणे त्याचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अर्ज भरते वेळी अपलोड करणे आवश्यक आहे.

i) अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र असावे.

ii) सदरचे छायाचित्र हे फिकट, रंगीत किंवा पांढऱ्या रंगाचा पृष्ठभाग असलेले असावे.

iii) कॅमेऱ्याकडे शांतपणे व स्थिर नजरेने पहावे. सूर्यप्रकाशात जर छायाचित्र काढणार असाल तर आपल्या छायाचित्रावर सावली पडणार नाही याची दक्षता घ्यावी. जर फलॅशचा वापर केल्यास red eye येणार नाही याची दक्षता घ्यावी.

iv) जर तुम्ही चष्मा वापरत असाल तर तुमचे डोळे दिसतील अशाप्रकारे छायाचित्र असावे.

v) छायाचित्र काढते वेळी टोपी, हॅट व गॉगल घालू नये, जेणेकरुन आपला चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

vi) छायाचित्राच्या फाईलचा आकार १०० kb पेक्षा कमी असावा व ते **.jpg** या प्रकारचे असावे.

vii) छायाचित्र व स्वाक्षरी अप-लोड करण्यासाठी Upload Photograph व Upload Signature या दोन स्वतंत्र लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. योग्य त्या लिंकवर क्लिक करावे व त्यानंतर छायाचित्र/ स्वाक्षरी असलेली File सिलेक्ट करावी व अप-लोड बटन दाबावे.

viii) उमेदवाराने छायाचित्र व स्वाक्षरी अपलोड केल्याशिवाय अर्ज अपलोड होणार नाही याची नोंद घ्यावी. उमेदवारांचे छायाचित्र अथवा स्वाक्षरी अस्पष्ट असल्यास त्याचा अर्ज अवैध ठरविण्यात येईल. त्यामुळे उमेदवाराने वर दिलेल्या सूचनांचे योग्य प्रकारे पालन करावे.

**ट)** उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. ऑनलाईन अर्जातील माहिती अचूक नोंदविली जाईल याची खबरदारी उमेदवारांनी स्वत: घ्यावी व यासाठी ऑनलाईन अर्ज भरताना उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे स्वत:जवळ बाळगावी. अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राहय धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर निवड प्रक्रियेच्या पुढील टप्प्यांवर उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती / विवरणपत्रे यापेक्षा वेगळी माहिती सादर केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. अर्जात नोंदविलेल्या माहितीबाबत निवड समिती जबाबदार राहणार नाही. मुलाखतीसाठी आमंत्रित उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करावी लागतील.

**ठ)** उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्याठिकाणी अप-लोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर व छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अप-लोड केल्यानंतर **"Confirm"** बटन दाबावे. एकदा **"Confirm"** बटनावर क्लिक केल्यावर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणे शक्य होणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. सदरची माहिती योग्य पध्दतीने न भरल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**ड)** रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उमेदवारास परीक्षा शुल्क भरण्यासाठीचे चलन व संपूर्ण अर्जाची प्रिंट घेता येईल. ऑनलाईन अर्जाची माहिती भरण्यास उमेदवार स्वत: जबाबदार आहे. त्यास निवड समिती कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. उमेदवाराने विहित मुदतीत परीक्षा शुल्क

भरण्याची कार्यवाही करावी जेणेकरुन शेवटच्या क्षणी अडचण येणार नाही. उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.

| योजनेचे नाव | परीक्षा शुल्क |
|---|---|
| महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी कार्यक्रम | रु.३५०/- |

**ढ)** परीक्षेकरीता विहित केलेले शुल्क चलनाद्वारे बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेत दि. १५/०७/२०१६ पर्यंत बँकेच्या वेळेत भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज करणे तसेच बँकेमध्ये शुल्क भरण्याची कार्यवाही विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. असे न केलेले ऑनलाईन अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. बँकेत शुल्क भरलेल्या उमेदवारांनाच परीक्षेचे प्रवेश पत्र जारी केले जाईल.

**ण)** निवड समितीमार्फत परीक्षेचे प्रवेशपत्र http://www.geexam.com या वेबसाईटवर दि. ०१ ऑगस्ट २०१६ पासून उपलब्ध करून देण्यात येईल. उमेदवाराने आपला लॉगिन आयडी व पासवर्ड वापरून परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घ्यावे. परीक्षेचे केंद्र, परीक्षेचे ठिकाण, पत्ता, परीक्षा दिनांक आणि वेळ प्रवेशपत्रात नमूद करण्यात येईल.

**क)** अर्जासोबत भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. परीक्षा शुल्क भरल्यानंतर मिळणारी पावती स्वत: जवळ ठेवणे आवश्यक राहील. परीक्षेच्या वेळी सदर पावती व ओळखपत्र हे प्रवेशपत्रासोबत सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने अर्जावर अपलोड केलेल्या स्वाक्षरी प्रमाणेच उपस्थिती पत्रावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

**त)** ऑनलाईन अर्जामध्ये सादर केलेली माहिती व मुलाखतीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रामधील माहिती यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल. यासाठी निवड समिती जबाबदार राहणार नाही.

**५) टप्पा २ : लेखी परीक्षा**

**क)** ऑनलाईन अर्ज यशस्वीपणे भरणाऱ्या उमेदवारांची OMR पद्धतीवर आधारित लेखी वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा (Written Objective Test) घेण्यात येईल.

**ख)** उमेदवारांची वस्तुनिष्ठ चाचणी परीक्षा राज्यातील ६ महसुली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी म्हणजे मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर व अमरावती या शहरांतील परीक्षा केद्रांवर घेण्यात येईल. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये लेखी परीक्षा देण्यासाठी उपरोक्त ६ पैकी एका मुख्यालयाच्या ठिकाणाचा विकल्प द्यावयाचा आहे.

**ग)** लेखी परीक्षेचे माध्यम मराठी असेल.

**घ)** लेखी परीक्षेमध्ये एक प्रश्नपत्रिका असेल ज्यामध्ये एकूण ९० प्रश्न असतील व त्यास एकूण ९० गुण असतील.

**ङ)** प्रत्येक योग्य उत्तरास १ गुण असेल. गुणांकन पद्धतीमध्ये निगेटिव्ह मार्किंग पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. त्यामध्ये प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एकूण प्राप्त गुणातून ०.३३ गुण कापण्यात येतील.

**च)** एका प्रश्नपत्रिकेचे सलग दोन भाग असतील. त्यापैकी सर्वसाधारण ज्ञान व क्षमता या प्रथम भागात ५० प्रश्न असतील तसेच सामाजिक विकास व आदिवासी विकासाबद्दलची जाण या द्वितीय भागात ४० प्रश्न असतील.

**छ)** परीक्षेचा ढोबळ अभ्यासक्रम खालील प्रमाणे असेल.

| भाग | विषय व गुण | एकूण गुण | प्रश्नांची संख्या | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ : सर्वसाधारण ज्ञान व क्षमता | (i) बुद्धिमापन चाचण्या – १२ गुण (ii) गणिती कौशल्य – १२ गुण (iii) भाषा कौशल्य – १२ गुण (iv) सामान्य ज्ञान – १४ गुण | ५० | ५० | एकूण ९० मिनिटे |
| २ : सामाजिक विकास व आदिवासी विकास | (i) महाराष्ट्रातील सामाजिक तसेच मानव विकासाची स्थिती – १० गुण (ii) महाराष्ट्रातील आदिवासी जमातींचे सांस्कृतिक वैविध्य – १० गुण (iii) आदिवासी समुदाय तसेच अनुसूचित क्षेत्राबाबत राज्यघटनेतील तरतुदी तसेच महत्वाचे कायदे व धोरणे – १० गुण (iv) आदिवासी उपयोजना तसेच आदिवासी विकासाच्या योजना व कार्यक्रम – १० गुण | ४० | ४० | |

**ज)** लेखी परीक्षा झाल्यावर त्याची आदर्श उत्तरसूची (Model Answer Key) http://www.geexam.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**झ)** लेखी परीक्षेचे गुण प्रत्येक उमेदवाराला त्याच्या लॉगिन आयडी मार्फत बघण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येईल .लेखी परीक्षेमध्ये Negative Marking पाहता उमेदवार मुलाखतीस पात्र होण्यासाठी त्यास Positive गुण मिळणे आवश्यक असेल. लेखी परीक्षेच्या गुणवत्ता यादीतून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या सुमारे ९० उमेदवारांची यादी ही http://www.geexam.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**ञ)** उमेदवारांची लेखी परीक्षा कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी न करता घेतली जाणार असून केवळ परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण आणि मुलाखतीचे गुण एकत्रित करून त्या आधारे अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

**६) टप्पा ३ : उमेदवारांच्या मुलाखती**

**क)** लेखी परीक्षेमध्ये केवळ पॉझिटीव गुण (Positive Marks) मिळालेल्या उमेदवारांच्या गुणश्रेणीतून एकूण १८ पदांच्या सुमारे पाचपट प्रमाणात उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

**ख)** अंतिम निवडीमध्ये मुलाखतीस १० गुण असतील.

**ग)** लेखी परीक्षेच्या आधारे निवडलेल्या पात्र उमेदवारांनी अर्जात दिलेल्या माहितीच्या पुष्ट्यर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या / कागदपत्रांच्या मूळ प्रती व स्वसांक्षाकित प्रती मुलाखतीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**घ)** शैक्षणिक अर्हतेचा पुरावा म्हणून अर्जात नमूद केलेल्या अर्हतेचे गुणपत्रक / प्रमाणपत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक राहील.

**ङ)** वयाच्या पुराव्यासाठी जन्म दाखला/ शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचा दाखला/ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**च)** अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**छ)** अधिवासाच्या पुराव्यासाठी अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

**ज)** उमेदवारास मराठी भाषेची जाण असल्याचा दाखला म्हणून इयत्ता १०वी अथवा १२वी मध्ये मराठी विषयात उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक सादर करणे आवश्यक राहील.

**झ)** उमेदवारास ग्रामीण किंवा आदिवासी भागामध्ये किमान तीन वर्ष काम केल्याच्या अनुभवाचा पुरावा म्हणून कोणतेही शासकीय कार्यालय अथवा कोणतीही नोंदणीकृत संस्था, सोसायटी, कंपनी यांच्या लेटरहेडवरील नियुक्ती आदेश अथवा अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**ञ)** प्राधान्य पात्रतेचा पुरावा म्हणून PMRDF या पदावर कार्यरत असल्याचे अथवा सदर पदावर काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**ट)** शालेय अथवा महाविद्यालयातील उपक्रमातील सहभागासाठी जसे की कला, सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ, नेतृत्व इत्यादीसाठी संबंधित शाळा / महाविद्यालयाचे प्रमाणपत्र / प्रशस्तीपत्र आवश्यक राहील.

**ठ)** विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा नावात बदल झाल्याबाबत अधिसूचित केलेले राजपत्र किंवा नावात बदल झाल्याबद्दलचे प्रतिज्ञापत्र यांच्या मूळ व साक्षांकित प्रती आवश्यक आहेत.

**७) सर्वसाधारण अटी :-**

**क)** उमेदवारांना लेखी परीक्षेला अथवा मुलाखतीला येण्याजाण्याचा प्रवासखर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

**ख)** निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार अपात्र आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्यांची उमेदवारी निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल.

**ग)** कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांने प्राप्त केलेले प्रमाणपत्र योग्य माध्यमातून प्राप्त केले नसल्यास किंवा गैरमार्गाने प्राप्त केले असल्यास अथवा खोटी किंवा बनावट असल्याचे दिसून आल्यास उमेदवाराचे नाव भरती प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**घ)** सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, या निवड प्रक्रियेच्या अनुषंगाने अद्ययावत सूचना, तारखेतील व इतर बदल http://www.geexam.com या संकेतस्थळावर प्रसारित करण्यात येतील. प्रत्येक उमेदवारास या सूचना स्वतंत्रपणे कळविल्या जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अद्ययावत सूचनेसाठी वरील संकेतस्थळ उमेदवाराने वारंवार पाहणे आवश्यक आहे.

**(निवड समिती)**
**महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी**